# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## पाहिजेत

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये , (अ) उपसरव्यवस्थापक एकूण ३ पदे ( १. पद माहिती व तंत्रज्ञान, १ पद. हिशेब विभाग, १ पद. प्रशासन व कायदा विभाग ) (ब) सहाय्यक सरव्यवस्थापक एकूण ३ पदे ( १ पद . माहिती व तंत्रज्ञान, १ पद. जोखीम व्यवस्थापन विभाग, १ पद. निधी नियोजन विभाग ) (क) व्यवस्थापक एकूण ३ पदे (१ पद . जोखीम व्यवस्थापन १ पद . निधी नियोजन १ पद. कर व्यवस्थापन ) ही पदे भरावयाची आहेत. यासंदर्भात "Times of India" या वर्तमानपत्रामध्ये दि.१०/०५/२०१७ (बुधवार) रोजी तसेच लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, व फायनान्शीयल एक्सप्रेस (एक्सप्रेस करिअर), मुंबई या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ११/०५/२०१७ (गुरुवार) रोजी जाहिरात देण्यात आली होती. पदांबाबतची माहिती / तपशिल / अर्हता / प्रक्रिया इत्यादी बाबी खालील नमूद केल्या आहेत. इच्छुक उमेदवारांनी खालील नमूद संपूर्ण तपशिलासह बँकेचे खालील नमूद पत्त्यावरती लेखी अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख **२५/०५/२०१७** आहे याची नोंद घ्यावी.

# MUMBAI DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LIMITED

## RECRUITMENT

Mumbai District Central Co-operative Bank Ltd. invites application from eligible candidates for the post of Dy. General Managers (Total 3 Posts - (1) I.T., (1) Accounts, (1) H.R. & Legal), Asst. General Managers (Total 3 Posts - (1) I.T., (1) Risk Management, (1) Funds Management) & Managers (Total 3 Posts - (1) Risk Management, (1) Funds Management, (1) Taxation). Advertisement regarding this is published in the daily News Papers "Times of India" dated 10/05/2017 (Wednesday) and Loksatta, Indian Express and Financial Express (Express Carriers), Mumbai dated 11/05/2017 (Thursday). For details like Qualification, Experience, Pay Scale, procedure etc. refer information mentioned below. Last date for submission of application is **25/05/2017**, may please be noted.

**पदनिहाय शैक्षणिक अर्हता इतर अर्हता उदा. वय, अनुभव, वेतनश्रेणी तसेच इतर अटी व शर्ती, पदांची संख्या याबाबतचा तपशिल : -**

| अ.क्र | श्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | उपसरव्यवस्थापक<br>**Dy. General Manager** | ३ |
| २ | सहाय्यक सरव्यवस्थापक<br>**Asst. General Manager** | ३ |
| ३ | व्यवस्थापक<br>**Manager** | ३ |
| | एकूण | ९ |

उपरोक्त ९ पदे विशेष तसेच तांत्रिक / व्यावसायिक पदे आहेत याकरीता खालील प्रमाणे अर्हता/ निकष आहेत. सदर पदे कर विभाग, हिशेब विभाग, कायदा विभाग, संगणक विभाग, निधी नियोजन विभाग, ALM, ALCO, RBS इत्यादी संदर्भात आहेत.

**हिशेब विभाग (Accounts & Department of Banking Operation)**

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | वय (जाहिरात दिनांकारोजी) | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| उपसरव्यवस्थापक<br>DGM<br>विभाग प्रमुख<br>HOD | कुठल्याही शाखेतील पदव्यूत्तर पदवी अथवा कुठल्याही शाखेतील पदवीसह किमान १५ वर्षाचा मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव.<br>विशेष अर्हता/प्राधान्य :- CA/ ICWA/MBA Finance/M.Com./ JAIIB / CAIIB/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) | ५० ते ५५ वर्षे पर्यंत | ११५५० -<br>५२५/५ -<br>१४१७५ -<br>६००/५ -<br>१७१७५ -<br>६७५/५ -<br>२०५५० -<br>७५०/५ -<br>२४३०० -<br>८२५/५ -<br>२८४२५ |

**ALM / ALCO / RBS विभाग**

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | वय (जाहिरात दिनांकारोजी) | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| सहाय्यक सरव्यवस्थापक<br>Asst. General Manager | कुठल्याही शाखेतील पदव्यूत्तर पदवी अथवा कुठल्याही शाखेतील पदवीसह किमान १० वर्षाचा मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव.<br>विशेष अर्हता/प्राधान्य :- CA/ ICWA/MBA Finance/M.Com./ JAIIB / CAIIB/ C-PEC (Certified Professional in Co-operative | ५० ते ५५ वर्षे पर्यंत | ९३०० -<br>४५०/५ -<br>११५५० -<br>५२५/५ -<br>१४१७५ -<br>६००/५ - |

| | | | |
|---|---|---|---|
| | Banking) | | १७१७५ - ६७५/५ - २०५५० - ७५०/५ - २४३०० |
| व्यवस्थापक Manager | कुठल्याही शाखेतील पदव्यूत्तर पदवी अथवा कुठल्याही शाखेतील पदवीसह किमान ७ वर्षाचा मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव. विशेष अर्हता/प्राधान्य :- CA/ MBA Finance/ M.Com./ JAIIB / CAIIB/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) | ४५ ते ५० वर्षे पर्यंत | २८०० - २५०/५ - ४०५० - ३००/५ - ५५५० - ३५०/५ - ७३०० - ४००/५ - ९३०० - ४५०/५ - ११५५० |

**कर विभाग (Tax Management Dept.)**

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | वय (जाहिरात दिनांकारोजी) | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| व्यवस्थापक Manager | कुठल्याही शाखेतील पदव्यूत्तर पदवी अथवा कुठल्याही शाखेतील पदवीसह किमान ७ वर्षाचा मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव. विशेष अर्हता/प्राधान्य :- CA/ MBA Finance/ M.Com./ JAIIB / CAIIB/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) | ४५ ते ५० वर्षे पर्यंत | २८०० - २५०/५ - ४०५० - ३००/५ - ५५५० - ३५०/५ - ७३०० - ४००/५ - ९३०० - ४५०/५ - ११५५० |

**निधी नियोजन विभाग (Funds / Treasury Department)**

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | वय (जाहिरात दिनांकारोजी) | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| सहाय्यक सरव्यवस्थापक Asst. General Manager | कुठल्याही शाखेतील पदव्यूत्तर पदवी अथवा कुठल्याही शाखेतील पदवीसह किमान १० वर्षाचा मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव. विशेष अर्हता/प्राधान्य :- CA/ ICWA/MBA Finance/M.Com./ JAIIB / CAIIB/ C-PEC (Certified Professional in Co-operative | ५० ते ५५ वर्षे पर्यंत | ९३०० - ४५०/५ - ११५५० - ५२५/५ - १४१७५ - ६००/५ - |

| | | | |
|---|---|---|---|
| | Banking) | | १७१७५ - ६७५/५ - २०५५० - ७५०/५ - २४३०० |
| व्यवस्थापक Manager | कुठल्याही शाखेतील पदव्यूत्तर पदवी अथवा कुठल्याही शाखेतील पदवीसह किमान ७ वर्षाचा मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव. विशेष अर्हता/प्राधान्य :- CA/ MBA Finance/ M.Com./ JAIIB / CAIIB/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) | ४५ ते ५० वर्षे पर्यंत | २८०० - २५०/५ - ४०५० - ३००/५ - ५५५० - ३५०/५ - ७३०० - ४००/५ - ९३०० - ४५०/५ - ११५५० |

**संगणक विभाग (Information Technology Dept.)**

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | वय (जाहिरात दिनांकारोजी) | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| उपसरव्यवस्थापक DGM विभाग प्रमुख HOD | कॉम्प्युटर सायन्स/इलेक्ट्रॉनिक व टेलिकम्युनिकेशनमधील पदवी (अभियंता)/एमसीए/पदवी मिळविण्याकरीता पुर्ण वेळ विद्यार्थी म्हणून अभ्यासक्रम पुर्ण केला असणे आवश्यक आहे. तसेच सदर संस्था AICTE मान्यताप्राप्त असावी अथवा Any graduate with A Level Qualification of Department of Electronic and Accredidation Computer Course (DOEACC) or its equivalent examination from Government recognized University / Institute.Msc IT अधिक किमान १५ वर्षाचा बँकेतील वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव आवश्यक. | ५० ते ५५ वर्षे पर्यंत | ११५५० - ५२५/५ - १४१७५ - ६००/५ - १७१७५ - ६७५/५ - २०५५० - ७५०/५ - २४३०० - ८२५/५ - २८४२५ |
| सहाय्यक सरव्यवस्थापक AGM | कॉम्प्युटर सायन्स/इलेक्ट्रॉनिक व टेलिकम्युनिकेशनमधील पदवी (अभियंता)/एमसीए/पदवी मिळविण्याकरीता पुर्ण वेळ विद्यार्थी म्हणून अभ्यासक्रम पुर्ण केला असणे आवश्यक आहे. तसेच सदर संस्था AICTE मान्यताप्राप्त असावी अथवा Any graduate with A Level Qualification of Department of Electronic and Accredidation Computer Course (DOEACC) or its equivalent examination from Government recognized University / | ५० ते ५५ वर्षे पर्यंत | ९३०० - ४५०/५ - ११५५० - ५२५/५ - १४१७५ - ६००/५ - १७१७५ - ६७५/५ - २०५५० - ७५०/५ - |

| | | | |
|---|---|---|---|
| | Institute.Msc IT अधिक किमान १० वर्षाचा बँकेतील वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव आवश्यक. | | २४३०० |

**कायदा / प्रशासन विभाग (Legal / Administration Dept.)**

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | वय (जाहिरात दिनांकारोजी) | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| उपसरव्यवस्थापक DGM विभाग प्रमुख HOD | कुठल्याही शाखेतील पदव्यूत्तर पदवी अथवा कुठल्याही शाखेतील पदवीसह किमान १५ वर्षाचा मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव. विशेष अर्हता/प्राधान्य :- MBA (H.R) / JAIIB / CAIIB / DBM / LLB / C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) | ५० ते ५५ वर्षे पर्यंत | ११५५० - ५२५/५ - १४१७५ - ६००/५ - १७१७५ - ६७५/५ - २०५५० - ७५०/५ - २४३०० - ८२५/५ - २८४२५ |

* **प्राधान्य क्रम -** शैक्षणिक अर्हता प्रथम तद्नंतर अनुभव.

**पदनामानुसार मिळणा-या वेतनाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-**

१. **उपसरव्यवस्थापक :**

अ) उमेदवारी कालावधी ६ महिने. त्यामध्ये मिळणारे वेतन - सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए) कमाल ५०% वेतन = दरमहा रू.४०,५९३/-

ब) उपरोक्तप्रमाणे उमेदवारी कालावधी पूर्ण केल्याचे नंतर मिळणारे वेतन - सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए + एचआरए + सीसीए) = दरमहा रू.९१,२४५/-

२. **सहाय्यक सरव्यवस्थापक :**

अ) उमेदवारी कालावधी ६ महिने. त्यामध्ये मिळणारे वेतन - सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए) कमाल ५०% वेतन = दरमहा रू.३७,६९८/-

ब) उपरोक्ताप्रमाणे उमेदवारी कालावधी पूर्ण केल्याचे नंतर मिळणारे वेतन - सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए + एचआरए + सीसीए) = दरमहा रू.८५,१६६/-

३. **व्यवस्थापक :**

अ) उमेदवारी कालावधी ६ महिने. त्यामध्ये मिळणारे वेतन - सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए) कमाल ५०% वेतन = दरमहा रू.२८,४७५/-

ब) उपरोक्तप्रमाणे उमेदवारी कालावधी पूर्ण केल्याचे नंतर मिळणारे वेतन - सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए + एचआरए + सीसीए) = दरमहा रू.६४,७९७/-

सेवेत कायम झाल्याचे नंतर त्या त्या वेळचे वेतन करारानुसार विविध सवलती व सोयी सुविधा देण्यात येतील. उदा. ग्रॅज्युईटी, प्रॉव्हीडंट फंड, रजा, प्रवासभत्ता व इतर भत्ते, सवलतीच्या दरातील कर्जे इत्यादी.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) उमेदवार भारतीय नागरिक असावा व महाराष्ट्रात १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचे कायम स्वरुपी वास्तव्य असावे.

२) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

३) यशस्वी उमेदवारांना स्वखर्चाने वैद्यकिय चाचणीसाठी जावे लागेल. तसेच वैद्यकिय चाचणीचे शुल्क अदा करावे लागेल. वैद्यकिय चाचणीत पात्र झाल्याशिवाय त्यांना नेमणूक दिली जाणार नाही. वैद्यकिय चाचणीचे ठिकाण निवड झालेल्या उमेदवारांना कळविण्यात येईल.

४) नेमणूकी नंतर उमेदवारीचा कालावधी ६ महिने इतका राहील.

५) उमेदवारीच्या कालावधीमध्ये नेमणूक झालेल्या पदाच्या मासिक मूळ वेतनाच्या (बेसिक + डीए + व्हिडीए) कमाल ५०% वेतन देण्यात येईल.

६) **उमेदवारी कालावधीतील सुट्टया :-** उमेदवारी कालावधीतील अधिकाऱ्याला ६ महिन्यात फक्त ६ दिवसांची पूर्ण पगारी किरकोळ रजा उपभोगता येईल. या व्यतिरिक्त त्यांनी घेतलेल्या रजा हया बिनपगारी असतील. तसेच अशा बिन पगारी रजेच्या कालावधीमुळे तितक्या दिवसांनी कायम करण्याची तारीख पुढे जाईल म्हणजे उमदेवारीचा कालावधी वाढेल.

७) **सानुग्रह अनुदान / बोनस :-** उमेदवारी कालावधीत कर्मचारी / अधिका-याला कोणत्याही प्रकारचे सानुग्रह अनुदान/ बोनस दिला जाणार नाही.

८) **प्रॉव्हीडंट फंड :-** उमेदवारी कालावधीत तसेच कायम झाल्यानंतर पी.एफ कॉन्ट्रीब्युशनकरीता मान्यताप्राप्त व प्रतिनिधी कर्मचारी संघटनेबरोबर वेतनविषयक जो करार अस्तित्वात येईल त्याप्रमाणे प्रॉव्हीडंड फंडाबाबतच्या रक्कमेबाबतचे नियम लागू होतील.

९) **ग्रॅज्युईटी :-** बँकेतील कर्मचा-यांकरीता ग्रॅज्युईटीबाबतचे नियम पेमेंट ऑफ ग्रॅज्युईटी ॲक्ट व मान्यताप्राप्त व प्रतिनिधी कर्मचारी संघटनेबरोबर होणा-या करारानुसार लागू होतील.

१०) थेट भरतीद्वारे बँकेच्या सेवेत येणा-या उमेदवारांनी उमेदवारीच्या कालावधीत रोजच्या रोज कामाची दैनंदिनी ठेवली पाहिजे व अधिका-यास तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली पाहिजे. ठराविक नमुन्यात प्रत्येक कर्मचा-यासाठी ऑफिस वर्कशीट ठेवून त्या कर्मचा-याने केलेल्या कामाबद्दल निश्चित मत देऊन विभाग प्रमुख सही करतील. संबंधित अधिका-याचे शेरे लक्षात घेऊन सहाव्या महिन्या अखेर एक गोपनिय अहवाल तयार केला जाईल. जर उमेदवारीच्या कालावधीत कर्मचा-याचे कामकाज कमी प्रतीचे (असमाधानकारक) असेल तर अशा कर्मचा-यांचा उमेदवारी कालावधी पुढील सहा महिन्यासाठी वाढविला जाईल किंवा कोणतेही कारण न देता त्याला सेवेतून कमी करण्यात येईल. याबाबत अंतिम निर्णय बँक व्यवस्थापनाचा राहील.

११) बँकेच्या सेवेत रुजु होण्यापूर्वी उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेचे दाखले, जन्म तारखेचा दाखला व जातीचे सक्षम अधिका-याकडील प्रमाणपत्र, रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टीशनरकडील शारिरीकदृष्टया बँकेचे काम करण्यास लायक असल्याबाबतचा दाखला सादर करावा लागेल. याबाबत बँकेकडून खातरजमा केली जाईल. यामध्ये माहिती खोटी असल्याचे आढळल्यास बँकेची फसवणूक केली असे गृहीत धरुन सदर उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच सदर उमेदवार बँकेच्या सेवेत असल्यास त्याला कामावरुन कमी करण्यात येईल व त्यांना अदा केलेल्या वेतनातील ५०% रक्कम वसूल केली जाईल.

१२) सेवेत कायम झाल्याचे नंतर उमेदवार नोकरी सोडून जात असल्यास त्याने एक महिन्याची नोटीस व रु.५०,०००/- इतकी रक्कम बँकेकडे जमा केल्यानंतरच त्याचा राजीनामा मंजूर होईल.

१३) बँकेच्या सेवेत रुजू होणा-या सर्व उमेदवारांना बँकेचे सेवानियम व स्थायी आदेश यामधील अटी व नियम बंधनकारक राहतील.

१४) खालील नमुद विहीत नमुन्यामध्ये अर्ज बँकेकडे सादर करताना सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करण्यात यावेत. तसेच लिफाफ्यावरती "भरतीकरीता अर्ज व पदाचे नाव" स्पष्ट नमूद करावे. अर्ज मा.सरव्यवस्थापक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित यांना अग्रेसित करावेत.

१५) भरती प्रक्रियेमध्ये प्राप्त अर्जाची छाननी बँकेकरवी केली जाईल. तद्नंतर बँकेस योग्य वाटणा-या उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलाविले जाईल. मुलाखत बँकेने नेमणूक केलेल्या निवड समितीव्दारे घेतली जाईल व यशस्वी उमेदवारांची निवड केली जाईल व सादर निर्णय बँकेचे वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. निवडीबाबतचा अंतीम निर्णय सर्वस्वी बँकेचा असेल. याबाबत कोणताही वाद / हरकती यांस बँक बांधील नाही. भरती प्रक्रियेसंदर्भात अंतीम निर्णय सर्वस्वी बँकेचा असेल. याबाबत सर्वाधिकार बँक राखून ठेवीत आहे.

१६) मुदत दिनांकानंतर प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच ई-मेल, फॅक्स इत्यादीव्दारे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाने पाठविलेले अर्ज उशिराने पोहोचल्यास अथवा गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी बँकेवर असणार नाही.

१७) विहित नमुन्यातील अर्ज रजिस्टर पोस्टाने पाठवावेत अथवा बँकेचे खालील नमूद पत्यावर प्रत्यक्ष सादर करावेत. कुरियरने पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१८) अर्जामध्ये आवश्यक तपशिल नमूद नसल्यास अर्ज बाद करण्यात येईल.

**अर्जाचा नमुना / आवश्यक तपशिल -**

- ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदाचे नाव.
- उमेदवाराचे संपूर्ण नाव
- उमेदवाराच्या वडिलांचे संपूर्ण नाव
- उमेदवाराच्या आईचे संपूर्ण नाव
- उमेदवाराची जन्मतारीख (dd/mm/yyyy)
- उमेदवाराचे अर्ज दिनांकारोजी वय
- उमेदवाराचे लिंग
- उमेदवाराची वैवाहिक स्थिती
- उमेदवाराचा आधार क्रमांक
- उमेदवाराचा पॅन क्रमांक
- उमेदवाराचा भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक
- उमेदवाराचा दूरध्वनी क्रमांक
- उमेदवाराचा ई-मेल आय डी
- उमेदवाराचा वास्तव्याचा तपशिलवार पत्ता (अर्जासोबत वास्तव्याबाबतचा पुरावा सादर करावा.)
- उमेदवाराची शैक्षणिक पात्रता संपूर्ण तपशिलासह. उदा.एस.एस.सी./शालांत परिक्षा / बारावी अथवा इंटरमिजीएट / पदवी / पदव्युत्तर पदवी / व्यावसायिक पदवी इत्यादी. यामध्ये शैक्षणिक आस्थापना / बोर्ड / युनिर्व्हसिटी / मिळालेले गुण / टक्केवारी / उत्तीर्ण केल्याचे वर्ष इत्यादी.
- उमेदवाराचा अनुभव संपूर्ण तपशिलासह. उदा. अस्थापनेचे नाव/अस्थापनेचा पत्ता संपर्क क्रमांकासह/ ग्रहण केलेले पद/ कालावधी इत्यादी.
- अर्जदाराने स्वत:चा पासपोर्ट साईज फोटो अर्जावरती लावावा. फोटो दि.०१/४/२०१७ नंतर काढलेला असावा व ती तारीख फोटोसोबत नमूद असावी.
- अर्जदाराने अर्जासोबत स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रती जोडाव्यात. यामध्ये :

१. जन्मतारखेकरीता पुरावा - जन्मदाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्याचा दाखला यापैकी एक.
२. शैक्षणिक अर्हता, यामध्ये अर्जदाराने नमूद केलेल्या तपशिलाबाबतचे पुरावे.
३. आधारकार्ड स्वसाक्षांकित छायाकिंत प्रत.
४. पॅनकार्ड स्वसाक्षांकित छायाकिंत प्रत.
५. नावामध्ये बदल असल्यास संबंधीत राजपत्राची (गॅझेट) प्रत.

- एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे झाल्यास स्वतंत्र अर्ज करावा.

- अर्ज मराठी अथवा इंग्रजी भाषेतूनच करावेत. अन्य भाषेतील अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
- **अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख - दिनांक २५/०५/२०१७**
- अर्ज पुढील पत्त्यावरती रजिस्टर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष सादर करावेत.

**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित**
**मुंबई बँक भवन, २०७ डॉ.डी.एन.रोड, फोर्ट,**
**मुंबई- ४०० ००१.**

अर्ज प्रत्यक्ष सादर करावयाचे झाल्यास उपरोक्त पत्त्यावर सकाळी ११.०० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील. (सार्वजनिक सुट्या, रविवार, प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार वगळून) अर्ज सिलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक आहे. सादर केलेल्या अर्जाची पोच दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

Z:\Vaishu\vb10978.doc